सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६२ | बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२६ नोव्हेंबर

- भारताच्या संविधानाला मान्यता देण्यात आली.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रस्तावित राज्यघटनेला मान्यता देण्यात आली.
- ९व्या आशियाई क्रीडा स्पर्धा दिल्लीत पार पडल्या.
- शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (ICMR) बायोमेडिकल संशोधनासाठी डॉ. रावसाहेब काळे यांची निवड झाली.
- मंगळ विज्ञान प्रयोगशाळेने क्युरिऑसिटी रोव्हरसह मंगळावर प्रक्षेपित केले
- रोबोटिक प्रोब इनसाइट मंगळावरील एलिशिअम प्लानिटियावर उतरले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# विद्यार्थिनींची रोज होणारी छेडखानी, गुंडांचा हैदोस

## या विरुद्ध उठवू आवाज...! जागवू यंत्रणा...!! वाचवू या लेकी-बाळी...!!!



आम्ही दैनिक ' ग्लोबल महातेज 'च्या माध्यमातून रोज वेगवेगळ्या समस्यांना वाचा फोडत आहोत. एक निःस्वार्थ व निष्कलंक जागल्याची आमची प्रामाणिक भूमिका आहे. हल्ली शहरात व तालुक्यात अनेक नागरी समस्या सर्वांना भेडसावत आहेत. त्याबाबत आम्ही वेळोवेळी पुरावे व छायाचित्रांसह वृत्त प्रसिद्ध करीत आहोत. संबंधित विभागांच्या उच्च पदस्थांपर्यंत याबाबतीत तक्रारीही करीत आहोत. हल्ली शहरातील सर्वांत ज्वलंत समस्या म्हणजे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या तरुणांकडून होणारा असहनीय व संतापजनक त्रास होय..!

या त्रासामुळे अनेक विद्यार्थिनींना त्यांचे जीवन नकोसे झाले आहे. गुंडांचा त्यांना कमालीचा त्रास होतो आहे. काही विद्यार्थिनींनी तर शिक्षणच बंद केले आहे. याबाबत आम्ही वेळोवेळी वृत्त प्रसिद्धही केले आहे. पोलिसांनी त्या अनुषंगाने काही कारवायाही केल्या आहेत. मात्र एवढ्याने हे सारे काही गैरप्रकार थांबणार नाहीत. त्यासाठी एका मोठ्या जनआंदोलनाची नितांत गरज आहे. आपल्या मुलींनी जीवाचे काही बरे-वाईट करून घेऊ नये किंवा एखाद्या गुंडाने तिला भररस्त्यावर संपवू नये, त्यांचे जीवन उद्ध्वस्त होऊ नये, यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन मोठे जनआंदोलन उभारणे गरजेचे आहे. पोलीस व प्रशासनाला जागे करणे आता अत्यावश्यक झाले आहे. शहराच्या तुलनेने येथील पोलिसांची संख्या खूप कमी आहे. त्यामुळे त्यांना देखील इच्छा असूनही सदर गैरप्रकारांबाबत नियमितपणे कारवाई करणे अशक्य झाले आहे. हे प्रशासनिक कारण असले, तरी त्यासाठी आपण आपल्या मुलींचे जीव, शिक्षण व करिअर धोक्यात घालू शकत नाही. समाजकंटक आणि गुंडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी, आपल्या मुलींना कायमस्वरूपी सुरक्षा लाभण्यासाठी पोलीस व प्रशासनाचे लक्ष वेधणे गरजेचे आहे. त्यासाठी आपणास नम्र विनंती, की **आपण आम्ही आयोजित केलेल्या जनआंदोलनासाठीच्या आयोजन व नियोजन बैठकीस सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खासगी क्लासेस संचालक, वकिल संघ, महिला मंडळ, सर्व सेवाभावी संस्था यांचे प्रतिनिधी कृपया अवश्य उपस्थित राहावे.**

**: बैठकीचे स्थळ :**
आयएमए लायन्स- हॉल, जी. एस. हायस्कूल प्रांगण, एस. टी. स्टँडच्या पाठीमागे, अमळनेर.

**: तारीख व वेळ :**
गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५, दुपारी ३.०० वाजता.

**विशेष आग्रही विनंती :**
आपण सारे खूप व्यस्त असतात, याची आम्हास जाणीव आहे. तरीही सर्वांनी बैठकीच्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शार्प टाईम उपस्थित राहावे, ही आग्रही प्रार्थना.

# पालिका निवडणूकीत उतरली तरुणाई!

## नगराध्यक्षांसह, नगरसेवकपदाचे अनेक उमेदवार उच्चशिक्षित

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**रजनीकांत पाटील**

अमळनेर- राजकारणात शिकलेली माणसे येत नाहीत, अशी सातत्याने ओरड होत असते. मात्र, यंदाच्या पालिका निवडणुकीत अमळनेर शहरात विविध पक्षांच्या पॅनलकडून उच्चशिक्षित तसेच युवा उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. अनेक अपक्ष उमेदवारही उच्चशिक्षित व तरूण आहेत. परिणामी यंदा पालिका निवडणूकीत तरूणाई व उच्चशिक्षितांचा मोठा सहभाग आहे.

यामुळे आगामी काळात अत्याधुनिक पद्धतीने पालिकेत विकासकामे होतील. अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. राजकारणाच्या भानगडीत शहाण्या माणसांनी पडू नये, असे म्हटले जाते.

साधे-सरळ व उच्चशिक्षित मंडळी राजकारणाला वर्ज्य मानतात.

यंदा पालिका निवडणुकीत मात्र हे चित्र बदललेले दिसते आहे. यंदा डॉक्टर, पत्रकार, पदवीधारक अशी उच्चशिक्षित मंडळी



नगराध्यक्ष, नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवित आहेत.

या मंडळींचा प्रचाराचा रोखही मुद्देसूद विचार मांडण्यावर आहे. काहींनी निवडून आल्यावर प्रभागात काय सेवा देऊ? काय सुविधा निर्माण करू? याबाबतचा पाच वर्षांचा विकासाचा कार्यक्रमच जाहीर केला आहे. ही उच्चशिक्षित मंडळी तसेच युवक कार्यकर्ते पालिकेत निवडून गेल्यावर चुकीच्या धोरणांना विरोध करतील व केवळ सह्याजीराव होणार नाहीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे समाजकारणात व राजकारणात दीर्घकाळापासून सक्रिय असलेली मंडळी तसेच त्यांच्या घरातील सदस्यही या निवडणुकीत उतरले आहेत. त्या मंडळींनीही जोरदार प्रचार यंत्रणा कोणती विकासकामे केली? व भविष्यात कोणती कामे करणार आहेत? याबाबतचा लेखा जोखाच मतदारांसमोर ठेवला आहे. आपण केलेली कामे पाहून निवडून द्या, असे आवाहनही सदर उमेदवार करीत आहेत. दुसऱ्यांदा किंवा त्यापेक्षाही अधिक वेळा विजयी झालेल्यांचा यावेळी नेमका काय निकाल लागतो हे पाहणे औत्सुक्यपूर्ण ठरेल. या अनुभवी मंडळींनी आपला पूर्ण अनुभव पणाला लावून नेहमी प्रमाणे साम,दाम, दंड, भेदाचे शस्त्र आता अंतिम टप्प्यात काढणे सुरू केले आहे.

काही उमेदवार निश्चितपणे निवडणूनआल्यात जमा आहेत. काहींना फिफ्टी-फिफ्टी संधी आहे. काहीं कडून भरपूर खावून-पिऊन, पैसे घेवूनही मतदार त्यांना अत्यंत अक्कलहुशारीने घरी पाठवतील, असेही चित्र आहे. काही ठिकाणी धक्कादायक निकाल अपेक्षित आहेत. काही ठिकाणी कमालीची चूरस व तणावाचे वातावरण वाढते आहे.

**अफवांचे पेव !**

निवडणुका म्हटल्या, की अफवांचा बाजार तेजीत असतोच. काही अफवा निवडणूकीच्या रणनितीचा भाग म्हणून मुद्दाम पसरविल्या जातात. त्याची खातरजमा होईल तेव्हा होईल, पण तोपर्यंत एक वातावरण तयार केले जाते. त्याचा मतप्राप्तीसाठी फायदा व्हावा, अशी अफवां पसरविणाऱ्यांची अपेक्षा असते. सध्या अशाच काही अफवा शहरात पसरल्या आहेत. त्या कोणाला फायद्याच्या व कोणाला फटका देणाऱ्या ठरतील, हे ३ डिसेंबरलाच कळेल.

**गुप्त प्रचाराचा रात्रीस खेळ चाले**

मतदानाला आता केवळ सहा दिवस शिल्लक आहेत. दिवसा सर्वच उमेदवार जोरदार प्रचार करीत आहेत. मात्र खरा प्रचार रात्रीच्या गुप्त भेटीगाठींतून जोर धरत आहे. काही नाराज तसेच विरोधी गटातील कार्यकर्त्यांना निवडणुकीत मदत करण्याचे साकडे घातले जात आहे. त्याबदल्यात विविध प्रकारची आमिषे दाखविली जात आहेत.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची अमळनेरला आज जाहीर सभा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता स्वामी नारायण मंदिराजवळील म्हस्कर प्लॉट येथे जाहीर सभा होणार आहे. सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील यांनी केले आहे.

शिवसेनेचे नेते माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी शिवसेना पक्षातील स्टार प्रचारक नेत्यांना सभेसाठी आमंत्रित केले आहे. यात मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणी पुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील व राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे मार्गदर्शन करणार आहेत. शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी, संजय मोरे, शिवसेनेचे आमदार चंद्रकांत सोनवणे, आमदार किशोर पाटील, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल पाटील, महिला आघाडी प्रमुख सौ. सरीताताई माळी-कोल्हे, युवासेना जिल्हाप्रमुख रोहित कोगटा, सौ. ललिताताई पाटील, डॉ. प्रमिलागीरी गोसावी यांची प्रमुख उपस्थिती राहील. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरविकास खात्याच्या माध्यमातुन शहरास भरघोस असा निधी मिळेल. अमळनेर शहराचा विकासाचा अनुशेष भरून निघेल, अशी अपेक्षा शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. परिक्षीत बाविस्कर यांनी व्यक्त केली आहे. शिवसेनेचे आजी- माजी नगरसेवक, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सदस्य, सर्व आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश पाटील यांनी केले आहे.

# अमळनेरची वाटचाल जिल्ह्याच्या दिशेने...!

## शहराच्या विकासाचा आलेख उंचावतोय...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर- शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मिताताई वाघ व माजी आमदार साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांच्या माध्यमातून शहराच्या विकासाचा आलेख उंचावत आहे. शहराच्या विकासासाठी नागरिकांनी अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीच्या पाठीशी राहावे, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे. आमदार अनिलदादा पाटील यांच्या विकासाच्या संकल्पनेने शहरात ताडे तलाव, महसूल इमारत, प्रशासकीय इमारत, पंचायत समिती इमारत तसेच बस स्थानकाचा कायापालट होतांना दिसत आहे. अमळनेर शहराची वाटचाल ही जिल्ह्याच्या दिशेने होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**ताडे तलाव पर्यटनाचे केंद्र होणार**

अमळनेर चोपडा रस्त्यावरील ताडेपूरा (पैलाड) भागात असलेल्या ताडे तलावाचे सुशोभीकरण व नमो उद्यानाचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. राज्य शासनाच्या निधीतून साडेपाच कोटींचा निधी या कामासाठी मंजूर झाला आहे. या निधीतून ही विकासकामे होणार आहेत. आजपर्यंत विकासापासून दूर असलेल्या या भागाला तलावाच्या सुशोभीकरणाच्या माध्यमातून विकासाची एक नवी चालना मिळणार आहे. तलावाच्या सुशोभीकरणामुळे



त्या परिसरातील नागरिकांना होणारा त्रास दूर होणार आहे. चांगल्या प्रतीच्या सुविधा मिळणार आहेत. यात विद्यार्थ्यांसाठी ओपन जिम, महिला, बालके, वयोवृद्ध नागरिकांसाठी नाना- नानी पार्क तसेच इतर सुविधा पुरविण्यात येणार आहेत. चोपडा रस्त्याकडून- अमळनेरात येताना शहराची एक वेगळी ओळख या तलावाच्या सुशोभिकरणाच्या माध्यमातून होणार आहे. जवळच श्री मंगळ ग्रह मंदिराचा परिसर आहे. मंदिरात देश-विदेशातून येणारे भाविक व पर्यटकांना हेवा वाटावा, असा हा तलावाचा परिसर येणाऱ्या काळात विकसित होणार असून काम प्रगतीपथावर आहे.

**प्रशासकीय इमारतींमुळे चकरा थांबणार**

अमळनेर-धुळे राज्य मार्गावर असलेल्या शहरातील मध्यभागी महसूल इमारत, प्रशासकीय इमारत तसेच पंचायत समितीची इमारत उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. २५ कोटींपेक्षा जास्त निधीच्या माध्यमातून ही कामे सुरू आहेत. शहरातील विविध भागात विखुरलेली लहान-मोठी शासकीय कार्यालये एकाच छताखाली यावीत हाच या इमारतींच्या बांधकामाचा मुख्य हेतू आहे. सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आल्याने शहरी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांची होणारी पायपीट थांबणार आहे. कामे लवकर मार्गी लागणार आहेत. बस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर सर्व कार्यालये होत असल्याने नागरिकांचा वेळही वाचणार आहे. तालुक्याचाच नव्हे तर जिल्ह्याच्या निर्मितीचा प्रश्न उद्भवला तर अमळनेरमध्ये त्या दृष्टीने उपाययोजना असावी. भविष्यात अमळनेर तालुक्याला जिल्ह्याचा दर्जा प्राप्त व्हावा, हीच दूरदृष्टी यामागे असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## दहा कोटीतून बसस्थानक नुतनीकरण

अमळनेर बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम देखील झपाट्याने होत आहे. असून जिल्ह्यात आदर्श ठरेल असे बसस्थानक १० कोटींच्या निधीतून उभारले जात आहे. बसस्थानकाच्या नूतनीकरणामुळे प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. काही महिन्यांपूर्वी आमदार अनिलदादा पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे बसस्थानकाला ५ आधुनिक बस गाड्या प्राप्त झाल्या आहेत. पुन्हा नवीन १० बस गाड्या लवकरच प्राप्त होणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भाग तसेच लांब पल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. दरम्यान, येणाऱ्या काळात हाच विकास यापेक्षा दुपटीने करण्याचा ध्यास आहे. शहराचा कायापालट होण्यासाठी शहर विकास आघाडीचे लोकनियुक्त नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र ठाकूर व सर्व प्रभागातील उमेदवारांच्या पाठीशी राहावे, असे आवाहन अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले.




मसाला पान





# हॅपी सीनिअर सिटीझन्स वीक!

**काय कमी करावे?**
१) मीठ २) साखर ३) पांढरा मैदा
४) दुधजन्य पदार्थ ५) प्रक्रिया केलेले अन्न.

**कोणते अन्न खावे?**
१) भाजीपाला २) कडधान्ये ३) शेंगा ४) सुकामेवा
५) थंड दाबलेले तेल (ऑलिव्ह, नारळ) ६) फळे.

**या तीन गोष्टी विसरण्याचा प्रयत्न करा**
१) आपले वय २) आपला भूतकाळ
३) आपल्या तक्रारी

**या गोष्टी आवर्जून जपा**
१) आपले कुटुंब २) सकारात्मक विचार
३) आपले मित्र ४) स्वच्छ व आनंदी घर.

**या तीन गोष्टी अंगीकारा**
१) नियमित शारीरिक हालचाल करा
२) वजनावर नियंत्रण ठेवा. ३) नेहमी हसत राहा

**सहा जीवनशैली सवयी ज्या पाळल्या पाहिजेत.**
१) तहान लागेपर्यंत थांबू नका, नियमित पाणी प्या.
२) दमल्यावरच विश्रांती घेऊ नका, वेळच्या वेळी आराम करा.
३) आजारी पडल्यावरच डॉक्टरकडे जाऊ नका, नियमित तपासणी करा.
४) चमत्काराच्या प्रतीक्षेत राहू नका.
५) स्वत:वर विश्वास ठेवा.
६) नेहमी सकारात्मक राहा आणि उज्ज्वल भविष्याचा विचार करा.
आपल्याकडे ४७ ते ९० वयोगटातील मित्र आहेत का? तर हा संदेश त्यांना जरूर दाखवा.

# कॉलेज छोड़कर की चपरासी की नौकरी
## फिर डांस में कमाया नाम, बन गया बॉलीवुड स्टार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धर्मेश येलांडे की जिंदगी एक प्रेरणा हैं। वडोदरा से शुरू हुआ स्ट्रगल उन्हें मुंबई खींच लाया। उन्होंने चपरासी की नौकरी की, 'बूगी वूगी' और 'डांस इंडिया डांस' से पहचान बनाई. 'एबीसीडी', 'स्ट्रीट डांसर' जैसी फिल्मों में एक्टिंग भी की।

बॉलीवुड और डांस की दुनिया में कई सितारे हैं, लेकिन कुछ ऐसे भी नाम होते हैं, जो अपनी मेहनत और जुनून की वजह से किसी पहचान के मोहताज नहीं होते। धर्मेश येलांडे ऐसे ही एक नाम हैं, जो आज हर घर में जाने जाते हैं। उनकी कहानी सिर्फ सफलता की नहीं है, बल्कि संघर्ष और मेहनत की मिसाल भी है। बचपन से ही डांस के लिए वह पूरे दिल से समर्पित रहे।

धर्मेश का मन भी इसी में लगता था, लेकिन बहुत कम लोग ही जानते हैं कि इस चमकती हुई जिंदगी के पीछे कड़ा स्ट्रगल भी था। धर्मेश ने अपने करियर की शुरुआत में कॉलेज छोड़कर चपरासी की नौकरी भी की थी। नाम और शोहरत पाने से पहले उन्होंने कभी पाई-पाई जोड़कर अपने परिवार का गुजारा किया था।

धर्मेश का जन्म ३१ अक्टूबर १९८३ को गुजरात के वडोदरा शहर में हुआ था। वे एक बहुत साधारण परिवार से हैं। उनके पिता चाय की छोटी दुकान चलाते थे और घर चलाना बहुत मुश्किल होता था। बचपन से ही धर्मेश को डांस का शौक था।

धर्मेश टीवी पर गोविंदा और अन्य बॉलीवुड डांसरों को देखकर उनकी नकल किया करते थे। घर छोटा होने की वजह से अक्सर वे गलियों में जाकर नाचते और अपनी प्रैक्टिस करते। छठी कक्षा में जब उन्होंने एक डांस प्रतियोगिता जीतकर अपने टैलेंट का सबूत दिया, तो उनके पिता ने उन्हें डांस क्लास में दाखिला दिलाया।

आर्थिक तंगी के कारण धर्मेश को पढ़ाई छोड़नी पड़ी। वे १९ साल के थे जब उन्होंने कॉलेज का रास्ता छोड़ दिया और चपरासी की नौकरी शुरू कर दी. इसके साथ-साथ वे बच्चों को डांस भी सिखाने लगे। उस समय उनकी मासिक कमाई लगभग १६०० रुपए थी। छोटीछोटी मेहनत और बचत के जरिए उन्होंने अपने सपनों को पूरा करने की शुरुआत की। उन्होंने खुद कहा था कि डांस उनके लिए सांस लेने जैसा था और इसलिए वे कभी हार नहीं मानते थे। धर्मेश ने मुंबई आकर अपने सपनों को नया आकार दिया। पहले वे बैकअप डांसर के तौर पर फिल्मों में काम करने लगे. धीरेधीरे उनका नाम सामने आया। 'बूगी वूगी' जैसे डांस शो ने उनके करियर को मोड़ दिया। इस शो में जीतने के बाद उन्हें 5 लाख रुपए की पुरस्कार राशि मिली, जिससे उन्होंने अपने परिवार का कुछ कर्ज चुकाया। इसके बाद उन्होंने कई डांस रियलिटी शोज में हिस्सा लिया और कोरियोग्राफी में भी हाथ आजमाया।

धर्मेश की जिंदगी में सबसे बड़ा मोड़ तब आया, जब उन्हें 'डांस इंडिया डांस' में मौका मिला. इस शो ने उन्हें रातों रात लोकप्रियता दिलाई। धर्मेश ने अपनी टीम के साथ कई प्रतिभागियों को तैयार किया और खुद भी जज के रूप में कई सीजन में नजर आए. इसके बाद उन्हें रेमो डिसूजा की फिल्मों 'एबीसीडी' और 'एबीसीडी २' में कोरियोग्राफर और एक्टर दोनों के तौर पर काम करने का मौका मिला।

धर्मेश 'स्ट्रीट डांसर' जैसी फिल्मों में भी दिखे। धर्मेश ने अपने करियर में कई पुरस्कार और सम्मान हासिल किए। वे न सिर्फ डांसर के रूप में, बल्कि कोरियोग्राफर और जज के रूप में भी पहचान बनाने में सफल रहे।

### कॉलेजपासून ठरवले लक्ष्य!
# सहा प्रयत्नांनंतर संस्कृती झाली आयएएस अधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा देशातील सर्वांत कठीण परीक्षा मानली जाते. ही परीक्षा उत्तीर्ण होऊन संस्कृती त्रिवेदी आयएएस झाल्या आहेत. जिद्द आणि चिकाटीने अभ्यासावर लक्ष केंद्रित करून त्यांनी हे यश प्राप्त केले.

**सहाव्या प्रयत्नात यश**

संस्कृती त्रिवेदी या बिहारमधील जमुई येथील रहिवासी आहेत. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. यूपीएससी सीएसई २०२४ मध्ये त्यांनी आपल्या सहाव्या प्रयत्नात ऑल इंडिया रँक १७ मिळविली. यापूर्वीही त्यांनी २०२२ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली होती. मात्र त्यावेळी मिळालेली रँक कमी असल्याने त्या आयएएस अधिकारी बनू शकल्या नव्हत्या. तरीही त्यांना स्वत:वर विश्वास होता आणि म्हणूनच त्यांनी पुन्हा परीक्षा दिली. अखेरीस त्यांच्या मेहनतीला यश आले आणि त्या आयएएस अधिकारी बनल्या.

**१७ वी रँक मिळवून इतिहास रचला**

२०२२ मध्ये त्यांना सरकारी नोकरी मिळाली होती. संस्कृती यांनी यूपीएससी सिव्हिल सेवा परीक्षा २०२४ मध्ये १७ वी रँक मिळवून इतिहास रचला होता. साधारणपणे सहाव्या प्रयत्नापर्यंत उमेदवार थकतात, पण त्यांच्यासाठी हाच प्रयत्न गेमचेंजर ठरला. संस्कृतीने यूपीएससी ऑप्शनल विषय म्हणून राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध निवडले होते. संस्कृती यांनी २०२२ मध्ये पहिल्यांदा यूपीएससी परीक्षा क्रॅक केली होती. त्यावेळी त्यांची रँक ३५२ वी होती. त्या आधारावर त्यांची इंडियन डिफेन्स अकाउंट्स सर्व्हिससाठी निवड झाली होती.

**रोज १५ तास अभ्यास**

संस्कृती यांनी दररोज १५ तास अभ्यास केला होता. त्यांनी वेळेचे व्यवस्थापन आणि शिस्तीला खूप महत्त्व दिले. यामुळे त्यांना प्रत्येक विषयाला पुरेसा वेळ देता आला. संस्कृती यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमधून शिक्षण घेतले आहे. राज्यशास्त्रात पदवी घेतल्यानंतर त्यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली होती. आयएएस अधिकारी बनण्याचे त्यांचे ध्येय एकदम स्पष्ट होते.

**कॉलेजपासूनचे स्वप्न**

यूपीएससी परीक्षा जगातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक आहे. भारतात दरवर्षी लाखो तरुण यूपीएससी परीक्षेचा फॉर्म भरतात. त्यापैकी केवळ सुमारे १ हजार जणच तिन्ही टप्पे यशस्वीपणे पार करून सरकारी अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतात. संस्कृती यांनीही कॉलेजच्या दिवसांमध्ये आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र त्या केवळ स्वप्नात रमल्या नाहीत तर स्वप्नाला वास्तवतेत उतरविण्यासाठी त्यांनी नियोजनबद्धरित्या व चिकाटीने प्रचंड मेहनत घेतली.



# पृथ्वीवर निर्माण होतोय नवा महासागर
## स्पष्टपणे दिसतेय सहा हजार कि.मी. लांबीची दरी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आफ्रिकन खंडात मोठी भूगर्भीय घटना घडत आहे. या घटनेमुळे जगभरातील भूगर्भशास्त्रज्ञ अचंबित झाले आहेत. टेक्टोनिक प्लेटचे विभाजन होत असून आफ्रिकन भूभागाचे तुकड्यात विभाजन होणार आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आता हे स्पष्ट होत आहे, की खंडाचे तुकडे होताना एक नवीन महासागर तयार होत आहे. हे पूर्व आफ्रिकेत घडत आहे जेथे तीन प्रमुख टेक्टोनिक प्लेट्स एकत्र येतात आणि हळूहळू वेगळे होतात. आफ्रिकन खंडाचे विभाजन होऊन एक नवीन महासागर निर्माण होत आहे. यामुळे जगाचा भूगोल बदलणार असून, अनेक नवीन प्रांत निर्माण होणार आहेत. हा नवीन महासागर अफार प्रदेशापासून केनिया आणि टांझानियाच्या सीमेपर्यंत पसरेल आणि आफ्रिकेच्या हॉर्नला एका विशाल बेटात रूपांतरित करेल. २००५ मध्ये इथिओपियामध्ये झालेल्या भूकंपाने शास्त्रज्ञांना धक्का दिला जेव्हा काही मिनिटांतच ६० किलोमीटर लांबीची भेगा निर्माण झाली. ज्यामुळे जमीन सुमारे दोन मीटरने वेगळी झाली.

शास्त्रज्ञांचा अंदाज आहे, की या प्रक्रियेला सध्या अनेक शंभर वर्षे लागतील. परंतु जेव्हा ती वेगवान होईल तेव्हा तिला फक्त काही सेकंद किंवा मिनिटे लागतील. ही प्रक्रिया सध्या मंद असली, तरी पृथ्वीच्या पृष्ठभागावर टेक्टोनिक प्लेट सरकत आहेत. दिवसेंदिवस यात लक्षणीयरीत्या वाढ होत आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, सोमाली प्लेट दरवर्षी काही मिली मीटर वेगाने पूर्वेकडे सरकत आहे, हळूहळू पृथ्वीच्या कवचाला ताणत आहे. उपग्रह आणि जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करून देखरेख केल्याने हे सिद्ध झाले आहे. पूर्व आफ्रिकेचा हा प्रदेश तीन प्रमुख टेक्टोनिक प्लेट्सच्या संगमावर आहे. सोमाली प्लेट, आफ्रिकन प्लेट आणि अरबी प्लेट. या प्रदेशात पृथ्वीचा पृष्ठभाग हळूहळू भेगा पडत आहे आणि खालून येणारा गरम मॅग्मा या प्रक्रियेला गती देत आहे. किलिमांजारोसारखे प्रचंड ज्वालामुखी पर्वत या भूगर्भीय कथेचे साक्षीदार आहेत. सुमारे २५ दशलक्ष वर्षांपासून सुरू असलेल्या खंडीय बदलाचे हे साक्षीदार आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे सुमारे सहा हजार किलोमीटरवर ही प्रचंड मोठी भेग दिसत आहे. पूर्व आफ्रिकेत खंडाचे विभाजन होण्याच्या खुणा स्पष्टपणे दिसत आहेत. एक दरी स्पष्टपणे दिसत असून, तिला 'ग्रेट रिफ्ट व्हॅली' असे नाव देण्यात आले आहे.

# सेरेना विल्यम्स : टेनिसची राणी

अमेरिकेतील गरीब भागात जन्मलेली सेरेना विल्यम्स आणि तिची बहीण व्हीनस विल्यम्स यांनी टेनिस कोर्टवर एक नवा अध्याय लिहिला. त्यांचे वडील रिचर्ड विल्यम्स यांनी दोघींकडून प्रचंड मेहनत करून घेतली. अनेकदा उपहास, जातीय भेदभाव, स्पॉन्सर मिळविण्याचे संकट त्यांच्यासमोर उभे राहिले. तरीही सेरेनाने २३ ग्रँडस्लॅम जिंकून विक्रम केला. गर्भावस्थेनंतरही तिने टेनिसमध्ये परत येत लढाऊ वृत्ती सिद्ध केली.
प्रेरणा : कठीण अडथळे, सामाजिक दबाव आणि आरोग्याच्या अडचणी असूनही हार न मानणे हीच विजेतेपदाची खरी ओळख आहे.



# दिवसाची सुरूवात आरोग्यपूर्ण करा, त्याने सकाळ आणि जीवन बदलू शकते!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकाळची सुरूवात म्हणजे दिवसाचा पहिला आणि सर्वांत महत्त्वपूर्ण ऋतू. पोट रिकाम्यावर उठल्यावर थोडे थंड किंवा हलके गरम पाण्याचे ग्लास घेणे, हे अनेकांना सहज आणि निरुपद्रवी सवय वाटू शकते. पण यात लिंबाचा रस आणि मध यांचा समावेश केल्यास तुमच्या आरोग्यावर, त्वचेशी आणि वजनाशी संबंधित बऱ्याच गोष्टी होऊ शकतात. चला तर, या साध्या पण प्रभावी आयुष्यमंत्राची माहिती घेऊया.



**सकाळची पहिली पायरी**

आपण जेव्हा सकाळी उठतो तेव्हा शरीराची पचनक्रिया थोडी कमी प्रमाणात चालू असते. अशा वेळेला रिकाम्यापोटी एक ग्लास गरम पाणी पिणे म्हणजे शरीरास एक हलकी 'डिटॉक्स' सुरूवात देणे. त्यात लिंबाचा रस आणि मध घालणे म्हणजे दोन नैसर्गिक घटकांचा कमाल संगम.

**लिंबाच्या रसाचे फायदे**

लिंबामध्ये असलेली व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स हे त्वचेसाठी वरदान आहेत. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार, उजळ आणि निरोगी वाटू लागते. कोणत्याही नवीन आरोग्य साधनाधारे सुरू करताना 'साधेपणा' महत्त्वाचा असतो. लिंबाचा रस हा साधा पण शक्तिशाली घटक ठरतो.

**कसे वापरायचे सोप्या स्टेप्समध्ये?**

सकाळी उठल्यानंतर प्रथम झटपट उठून पाण्याची एक मुठ्ठी गरम करून घ्या. त्यात लिंबाचा रस (एक लिंब किंवा त्याचा अर्धा) घाला आणि एक चमचा मध मिसळा. हलक्या घोट्यांनी घ्या, झटपट पिण्याऐवजी थोड्या वेळाने घोटाळून पिणे उत्तम. प्याल्यानंतर १५-२० मिनिटे काही खाऊ नका, या वेळेत पचनक्रिया सुरू होईल. नंतर हलका नाश्ता करा आणि दिवसभर पाणी पुरेसे प्या.

**मध गोड पण आरोग्यासाठी...**

मध म्हणजेच नैसर्गिक गोडी, पण त्याचबरोबर हळूहळू शरीराला ऊर्जा देणारी आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करणारी खाद्यघटकही आहे. पोटात हलका ताण तोडण्यासाठी आणि शरीरात उत्तम प्रकारे पोषण देण्यासाठी मध उपयुक्त आहे.

**पोट साफ आणि वजन नियंत्रण**

जेव्हा आपण रिकाम्यापोटी हे मिश्रण घेतो तेव्हा हे पाण्याचे 'क्रबिंग' प्रभाव निर्माण करतो. म्हणजेच आतल्या अवशिष्ट पदार्थांना हलक्या पद्धतीने बाहेर काढण्यास मदत करतो. नियमितपणे हे करत राहिल्यास पोटाचा फुगीरपणा कमी होण्याची शक्यता वाढते. ज्या व्यक्ती वजन कमी करण्याच्या प्रवासावर आहेत त्यांच्यासाठी ही एक सुलभ आणि सुरळीत मदत ठरू शकते.

**त्वचेशी संवाद साधा**

साधे पण प्रभावी, ताजे लिंबांचा रस आणि मध यांचे मिश्रण शरीरात अँटीऑक्सिडंट्स पुरवते. ज्यामुळे त्वचेला सूज कमी, अंकुर (ब्रँकलायट) कमी आणि एक झळाळीपूर्ण लूक मिळू शकतो. ज्यांना 'फेसबूस्ट'सारखी एखादी व्हिटॅलिटी हवी आहे त्यांच्यासाठी हे अगदी परिपूर्ण आहे.

**नियमितपणे वापरण्याचा मंत्र**

सकाळी उठल्यावर २०-३० मिनिटांत हा ग्लास पिण्याचा सवय लावण्याची शिफारस आहे. गरम पाण्यात म्हणजेच उघडपणे गरम नसलेले, पण हलके गरम पाणी घ्या त्यात लिंबाचा अर्धाचा किंवा एक ग्रामीण (चला थोडा साधा) लिंबाचा रस आणि एक चमचा मध घाला. पहिला ग्लास प्या आणि नंतर १५-२० मिनिटांनी हलका नाश्ता करा. हे रोज सुरू केल्यानंतर काही आठवड्यांनी त्याचा परिणाम नक्की जाणवेल.

**काही टिप्स व लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी...**

- मध थंड पाण्यात टाकू नका. गरम पाणी मधामध्ये ठेवू नका. कारण त्यातून मधातील पौष्टीक घटक कमी होऊ शकतात.
- लिंबाचा रस आणि मध योग्य प्रमाणात घ्या. जास्त प्रमाणात घेतल्यास पोटाला हलका ताण जाणवू शकतो.
- नियमिततेचा पाठपुरावा महत्त्वाचा आहे. केवळ एका-दोन दिवसांनी परिणाम दिसणार नाहीत.
- जर तुमच्या पचनसंस्था किंवा इतर आरोग्यविषयक अडचणी असतील, तर हा उपाय सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

दै. ‘ ग्लोबल महातेज’तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!



# धर्मेंद्र : रूपेरी पडद्यावरील ॲक्शन हिरो

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**धर्मेंद्र हे पडद्यावर ‘ ही– मॅन ’, वास्तव आयुष्यात कवी, जगातील सर्वांत देखण्या पुरुषांमध्ये समावेश असलेले, व्यसनावर मात करणारे व्यक्ती आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीतील ‘ ही–मॅन ’ म्हणून ओळख असणारे अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून म्हटले आहे, की ‘ धर्मेंद्रजींच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका युगाचा अंत झाला आहे.’ काही दिवसांपूर्वी धर्मेंद्र यांना श्वसनाच्या त्रासामुळे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, काही दिवसांच्या उपचारानंतर ते घरी परतले. घरीच त्यांच्यावर उपचार सुरू होते. रूपेरी पडद्यावर ॲक्शन हिरो किंवा ‘ ही–मॅन ’ अशी प्रतिमा असलेले अभिनेते धर्मेंद्र कवी मनाचे व्यक्ती होते. मात्र, ॲक्शन हिरो किंवा ‘ ही–मॅन ’सारख्या नावांनी ओळखले जाणाऱ्या धर्मेंद्र यांना जर या प्रतिमेच्या पलीकडे जाऊन जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तर ते यापलीकडे बरेच काही होते.**




‘ अनुपमा ’ या चित्रपटात एक संवेदनशील लेखक, सामाजिक बांधिलकी जपणारा सत्यकाममधील आदर्शवादी जिद्दी तरुण, विनोदाने पोट धरून हसवणारा ‘ चुपके–चुपके ’ चित्रपटातील प्रोफेसर परिमल धर्मेंद्र यांच्या अभिनयाचे असे अनेक पैलू होते.

वास्तविक आयुष्यात ते कवी, एक प्रेमी, एक पिता, जगातील सर्वांत देखण्या पुरुषांमध्ये समावेश असलेले, दारूच्या व्यसनावर मात करणारा व्यक्ती आणि राजकारणातील वन–टाइम नेता होते.

## नवाज शरीफसुद्धा होते धर्मेंद्रचे चाहते

पंजाबात १९३५ मध्ये जन्मलेले धर्मसिंह देओल यांचा त्यांच्या नरसाली गावापासून ते मुंबईपर्यंतचा प्रवास हे एक सुंदर स्वप्नच होते. अभिनेते धर्मेंद्र यांचे भारतात तर लाखो चाहते आहेतच. मात्र पाकिस्तानातही त्यांचे असंख्य चाहते आहेत. यात पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांचा देखील समावेश आहे.

## धर्मेंद्र यांनी ऐकविलेला एक किस्सा

जेव्हा नवाज शरीफ भारतात आले होते तेव्हा माझी त्यांच्याशी भेट झाली होती. नवाज शरीफ म्हणाले होते, की त्यांचे कुटुंब कारमधून जात होते. त्यावेळी त्यांनी माझ्या घरासमोर त्यांची कार थांबवली होती. त्यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलांना सांगितले होते, की पाहा, हे धर्मेंद्र यांचे घर आहे.

## महेश भट्ट यांच्यासाठी धर्मेंद्र यांनी ट्रक ड्रायव्हरकडून कपडे घेतले उधार

धर्मेंद्र त्यांच्या अभिनयासाठी प्रसिद्ध होतेच. मात्र त्यांच्या उदारपणाबद्दलचे किस्सेदेखील प्रसिद्ध होते. लेखक राजीव विजयकर यांनी ‘ धर्मेंद्र – नॉट जस्ट अ ही–मॅन ’ हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात धर्मेंद्र यांचे असे अनेक किस्से देण्यात आले आहेत. या पुस्तकात महेश भट्ट म्हणतात, ‘ दो चोर ’ या चित्रपटाच्या सेटवर मी सहाय्यक म्हणून काम करत होतो. मी नीट सूचना दिल्या नाहीत. त्यामुळे धर्मेंद्र यांचा ट्रक ड्रायव्हरचा पोशाख चित्रीकरण स्थळापासून दूर असलेल्या हॉटेलातच राहिला होता. ते दृश्य कोणत्याही परिस्थितीत सकाळी– सकाळीच चित्रीत होणे आवश्यक होते. नाहीतर निर्मात्याचे मोठे नुकसान झाले असते. मग मी धर्मेंद्र यांना माझी अडचण सांगितली. धर्मेंद्र यांनी सहानुभूतीने माझे म्हणणे ऐकून घेतले. ते उठले, जवळच एक ट्रक ड्रायव्हर होता. ते त्या ड्रायव्हरकडे गेले. धर्मेंद्रजींनी त्या ड्रायव्हरने घातलेले मळलेले कपडे तात्पुरते त्याच्याकडून घेतले आणि एक ड्रेसमॅनने केलेली चूक त्यांच्या उदारपणाने आणि कल्पनाशीलतेने झाकून टाकली.

## दिलीप कुमारांमुळेच अभिनयाची इच्छा

धर्मेंद्र यांच्या बालपणाबद्दल बोलायचे झाले, तर त्यांचे वडील लुधियानाजवळच्या सानेवाल गावात गणिताचे शिक्षक होते. तेथे सिनेमा पाहणे ही खूपच दूरची गोष्ट होती. लहानपणी एकदा धर्मेंद्र यांनी चोरून दिलीप कुमार यांचा ‘ शहीद ’ हा चित्रपट पाहिला. तो १९४८ मधील चित्रपट होता. धर्मेंद्र म्हणतात, की त्या चित्रपटाने आणि दिलीप कुमार यांनी त्यांच्या मनावर जणू काही गारूडच केले होते. एकप्रकारे त्याच दिवशी त्यांचे भवितव्य निश्चित झाले होते.

## धर्मेंद्र यांना नशिबाचीही साथ

१९५८ मध्ये फिल्मफेअर मासिकाने एका टॅलेंट हंटची घोषणा केली. त्यात बिमल रॉय आणि गुरू दत्त यांच्यासारखे दिग्गज देखील होते. त्यावेळेस मलेरकोटलामध्ये नोकरी करत असलेले धर्मेंद्र तेथे जान मोहम्मद फोटो स्टुडिओमध्ये गेले. ते म्हणाले, की काहीतरी असे करा की मी दिलीप कुमार होईल आणि माझी निवड होईल. आणि झालेही तसेच. गावातील मुलगा निवडला गेला आणि मुंबईत पोहोचला. मग सुरू झाली एखाद्या चित्रपटाला साजेशी कहाणी. त्यात भावना होत्या, नाट्य होते आणि शोकांतिका देखील होती.

## बिमल रॉय यांचे धर्मेंदू आणि बंदिनी

बिमल रॉय यांनी धर्मेंद्र यांना अभिनयाची पहिली संधी दिली होती. तो चित्रपट होता ‘ बंदिनी ’. बिमल रॉय त्यांना ‘ धर्मेंदू ’ म्हणायचे. अर्थात बंदिनी चित्रपट पूर्ण होण्यास वेळ लागला. या दरम्यान संघर्षाच्या काळात अर्जुन हिंगोरानी यांनी धर्मेंद्र यांना ‘ दिल भी तेरा हम भी तेरे ’ या चित्रपटात भूमिका दिली.

## धर्मेंद्र यांना फिल्मफेअरचे पहिले मानांकन

१९६६ मध्ये आलेल्या ‘ फूल और पत्थर ’ या चित्रपटाने खऱ्या अर्थाने सोलो हिरो म्हणून धर्मेंद्र यांची ओळख निर्माण झाली. या चित्रपटात एक दृश्य होते, की गुंड, दारूड्याच्या भूमिकेतील धर्मेंद्र त्यांचा शर्ट काढून एक भिकारी आणि विधवेच्या अंगावर टाकतात. त्यावेळेस कोणत्याही हिरोची अशी बॉडी नव्हती. याच चित्रपटात ‘ ही– मॅन ’ची पहिली झलक पाहायला मिळाली. याच चित्रपटाने धर्मेंद्र यांना फिल्मफेअरचे पहिले नामांकनदेखील मिळवून दिले.

## अमिताभ बच्चन, राजेश खन्ना असूनही हिट

१९६० चे दशक येईपर्यंत धर्मेंद्र यशाच्या पायऱ्या चढत होते. मात्र, त्यांना मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत होते. ६० च्या दशकाच्या सुरूवातीला जेव्हा धर्मेंद्र यांच्या करिअरची सुरूवात होत होती तेव्हा शम्मी कपूरचा जमाना होता. १९७० चे दशक सुरू होईपर्यंत राजेश खन्ना नावाचे वादळ आले. तर धर्मेंद्र जेव्हा यशाच्या शिखरावर होते, तेव्हा अमिताभ बच्चन यांनी सर्वांवर गारूड केलेले होते. मात्र या सर्व स्पर्धेतही धर्मेंद्र बहुधा एकमेव अभिनेते होते जे ६० च्या दशकापासून ते ८० च्या दशकापर्यंत हिट मशीनप्रमाणे टिकून राहिले.

## ‘ सर्वांत देखणा अभिनेता ’

धर्मेंद्र ऐन भरात असताना त्यांचा समावेश जगातील सर्वांत देखण्या पुरुषांच्या यादीत करण्यात आला होता. धर्मेंद्र यांचे आदर्श होते दिलीप कुमार. एका कार्यक्रमात दिलीप कुमार म्हणाले होते, की जेव्हा ते देवाला भेटतील तेव्हा त्याला विचारतील की देवाने त्यांना धर्मेंद्रसारखे देखणे का बनवले नाही. याबद्दल धर्मेंद्र म्हणाले होते, की ‘ मी विचार करतो, की लोक म्हणत असतील तर कदाचित खरेच असेल. ते मला ‘ ही– मॅन ’ म्हणतात, ग्रीक गॉड म्हणतात. मी माझ्या गुणांमध्येदेखील उणिवा शोधत असतो. माझ्या चाहत्यांच्या मनात माझे जे स्थान आहे, ते मी गमावू नये याचाच मी विचार करतो.’

अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ पाडणारा हा कलाकार नृत्यकौशल्यात मात्र जेमतेमच होता. मात्र, तरीदेखील जट पगला यमला दिवाना सारखी त्यांची गाणी अत्यंत लोकप्रिय झाली. या गाण्याबद्दल धर्मेंद्र म्हणाले होते, की चित्रपटात मी लोकांसमोर नाचण्यास नकार दिला होता. त्यामुळे माझ्यासाठी आणि रेखासाठी क्रेन आणण्यात आली. मग मी असा खुललो की माझा संकोचच निघून गेला. तुमचा धरम बेशरम झाला.

## बी ग्रेड चित्रपटातील धर्मेंद्र

सत्यकाम आणि चुपके–चुपके सारखे अप्रतिम चित्रपट करणाऱ्या धर्मेंद्र यांना १९९० च्या दशकात पापी देवता, वीरू दादा, डाकू भैरव सिंह, महा शक्तिशाली यासारख्या चित्रपटात भूमिका कराव्या लागल्या. त्यांच्या या भूमिका पाहणे हे त्यांच्या अनेक चाहत्यांसाठी वेदनादायी होते. लेखक राजीव विजयकर यांनी ‘ धर्मेंद्र– नॉट जस्ट ए ही मॅन ’ हे पुस्तक लिहिले आहे. त्यात ते लिहितात, की १९९० ते २००३ पर्यंतच्या कालखंडाला धर्मेंद्र यांच्या करिअरमधील रेट्रोग्रेड काळ म्हणता येऊ शकते. १९९९ मध्ये कांती शाह यांचा मुन्नीबाई हा चित्रपट आला होता. या चित्रपटापासून धर्मेंद्र पूर्णपणे बी ग्रेड चित्रपटांचा भाग झाले. याच पुस्तकात राजकुमार संतोषी म्हणतात, की धरमजींचा चाहता म्हणून मी म्हणू शकतो की त्यांचा जो काही नाईलाज असेल. मात्र सी ग्रेड चित्रपट करून त्यांनी त्यांचा करिश्मा पुसट केला. त्यांच्या चाहत्यांचा विश्वास मोडला. २५ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी जे कमावले होते त्या प्रतिमेला त्यांनी धक्का पोहोचविला. ही खूप दुःख करणारी गोष्ट आहे.

## धर्मेंद्र आणि राजकारण

चित्रपटांच्या दुनियेतून त्यांनी राजकारणातदेखील प्रवेश केला. अटलबिहारी वायपेयी यांच्या सांगण्यावरून त्यांनी बिकानेरमधून लोकसभेची निवडणूकदेखील लढवली. खासदार म्हणून ते निवडून आले. मात्र राजकारणात येणे ही मोठी चूक असल्याचे ते मानतात.

अभिनयाव्यतिरिक्त उर्दू आणि शायरी यांच्यावर धर्मेंद्र यांचे नेहमीच प्रेम होते. उर्दू भाषेवरील प्रेमाबद्दल त्यांनी “एहसानमंद हूँ ज़बांने उर्दू तेरा तेरी जबां में बयान–ए–ऐहसास–ए–दिल आ गया” असे म्हटले होते. धर्मेंद्र भावनिक, रोमँटिक, कवी मनाचा असलेला एक ॲक्शन स्टा होते. प्रसिद्धी आणि स्टारडमबद्दल त्यांनी सांगितले होते, की होती है तारीफ़ अहमियत की, इंसानियत की मगर कदर होती है. तरजीह न दे ओहदे को इंसानियत पे, बंदे पर ख़ुदा की तब नज़र होती है.. त्यांच्या अभिनयात एक साधेपणा, एक सौम्यता होती. ती कधी रूपेरी पडद्यावर दिसली, तर कधी ‘ ही–मॅन ’च्या प्रतिमेखाली दबलेली राहिली. मात्र, धर्मेंद्र यांचा हा शोध कधी संपला नाही. त्यांच्याच एका चित्रपटातील एक संवाद आहे, की ‘ कुछ पाने की चाह, कुछ और बेहतर की तलाश.. इसी चक्कर में इंसान अपना सब कुछ खो बैठता है जो उसके पास होता है. तलाश कभी ख़त्म नहीं होती. वक़्त ख़त्म हो जाता है...’ हा देखील योगायोगच आहे, की डिसेंबरमध्ये धर्मेंद्र यांचा ‘ इक्कीस ’ हा चित्रपट प्रदर्शित होईल तेव्हा या देखण्या, अष्टपैलू अभिनेत्याला त्यांचे चाहते शेवटचे रूपेरी पडद्यावर पाहतील.



## चुपके–चुपकेतील विनोदी भूमिका

नंतर धर्मेंद्र यांचे ‘ हकीकत ’, ‘ दिल ने फिर याद किया ’, ‘ ममता ’, ‘ मेरे हमदम मेरे दोस्त ’ यासारख्या चित्रपट आले. या चित्रपटांमध्ये बिमल रॉय, ऋषिकेश मुखर्जी, चेतन आनंद यांच्यासारख्या दिग्दर्शकांनी त्यांच्या अभिनयाला आणखी पैलू पाडले. मग आले १९७० चे दशक. ज्यात धर्मेंद्र यांचे वेगळेच रूप प्रेक्षकांना रूपेरी पडद्यावर दिसले. त्यात ॲक्शन, रोमान्स, कॉमेडी, असे व्यावसायिक सिनेमात असणारे सर्व काही होते. या काळात धर्मेंद्र यांचे ‘ जीवन मृत्यू ’, ‘ सीता और गीता ’, ‘ चरस ’, ‘ ब्लॅकमेल ’, ‘ चुपके चुपके ’ हे एकापाठोपाठ एक हिट चित्रपट आले.

१९७५ मध्ये ‘ शोले ’ प्रदर्शित झाला. या चित्रपटातील वीरूच्या भूमिकेने तर धर्मेंद्र यांची वेगळीच ओळख निर्माण झाली. तोपर्यंत त्यांची लोकप्रियता शिखरावर पोहोचली होती. शोलेमधील पाण्याच्या टाकीवर चढण्याचा तो सदाबहार सीन कोणही विसरू शकत नाही. ‘ व्हेन आय डेड, पोलीस कमिंग..पोलीस कमिंग, बुढिया गोईंग जेल...इन जेल बुढिया चक्की पीसिंग अँड पीसिंग अँड पीसिंग ’ हे संवाद आजदेखील प्रेक्षकांना पाठ आहेत.टांगेवाल्या बसंतीबरोबर टांग्यावर रोमान्स करणारा वीरू लोकांना भावला होता. त्यामुळे या चित्रपटाने धर्मेंद्र यांचे स्टारडम प्रचंड वाढले होते.



## ‘ अनुपमा ’मधील कवी आणि सत्यकाम

धर्मेंद्र यांच्या करिअरबद्दल बोलायचे झाले तर ‘ अनुपमा ’ आणि ‘ सत्यकाम ’ हे त्यांचे आवडते चित्रपट आहेत. ते ऋषिकेश मुखर्जींनी बनविले होते. १९६९ मध्ये आलेल्या सत्यकाममध्ये धर्मेंद्र यांची भूमिका वेगळीच होती. स्वातंत्र्यानंतरच्या भारतात सत्याला सर्वांत वरचे स्थान देणारा सत्यप्रिय (धर्मेंद्र) त्याचे सर्व काही पणाला लावण्याइतका आदर्शवादी असतो. एखादे पात्र आपल्या मनात एकाच वेळी इतक्या भावना कशा काय निर्माण करू शकतो, याचा विचार करूनही आपण थक्क होतो. इतके दुःख, वेदना, प्रेम, भीती, सहानुभूती आणि अभिमान. ऋषिकेश मुखर्जीदेखील ‘ सत्यकाम ’ला त्यांचा आणि धर्मेंद्र यांचा सर्वोत्तम चित्रपट मानत होते. तर ‘ अनुपमा ’ या चित्रपटात धर्मेंद्र असे मनात घर करणारे लेखक होते, जो अशा मुलीच्या मनात स्थान मिळवतो, जिने सर्वांसाठी मनाचे दरवाजे बंद केले आहेत. तो लेखक जेव्हा गातो की ‘ या दिल की सुनो दुनियावालों या मुझको अभी चुप रहने दो...’ किंवा तो गातो, ‘ छलकाए जाम आइए आपकी आँखों के नाम ’, हे गीत गातो तेव्हा तो तुमच्या मनाला खोलवर स्पर्श करून जातो.



## हेमा मालिनी आणि धर्मेंद्र यांची प्रेमकहाणी

याच काळात धर्मेंद्र हे हेमा मालिनी यांच्या प्रेमात आकंठ बुडालेले होते. मात्र, धर्मेंद्र यांचे प्रकाश कौर यांच्याशी आधीच लग्न झालेले होते. १९८० मध्ये धर्मेंद्र यांनी ड्रीम गर्ल हेमा मालिनी यांच्याशी लग्न केले, तेव्हा त्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता.

लेखक राम कमल मुखर्जी यांनी ‘ बिआँड द ड्रीम गर्ल ’ हे हेमा मालिनी यांचे चरित्र लिहिले आहे. त्यात मुखर्जी यांनी लिहिले आहे, की १९७४ मध्ये जितेंद्र आणि हेमा मालिनी यांच्या आई–वडिलांनी दोघांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला होता. अर्थात तोपर्यंत हेमा मालिनी यांच्या आयुष्यात धर्मेंद्र आले होते. धर्मेंद्र यांना जेव्हा या लग्नाबद्दल माहित झाले, तेव्हा ते थेट मद्रासला पोहोचले, जेथे हे लग्न होणार होते. धर्मेंद्र हे हेमा मालिनीशी एकांतात बोलले आणि मग ते लग्न झाले नाही. नंतर धर्मेंद्र चित्रपट निर्मातेदेखील झाले. त्यांनी सनी देओल आणि बॉबी देओल या त्यांच्या मुलांना विजेता फिल्म्ज या बॅनरखाली लाँच केले. मुलांना जरी चित्रपटांच्या दुनियेत आणले तरी मुलींना या क्षेत्रात आणण्यासाठी धर्मेंद्र तयार नव्हते. ईशा आणि अहाना या मुलींनी चित्रपटात काम करावे, असे त्यांना वाटत नव्हते. करिअर यशाच्या शिखरावर असताना धर्मेंद्र यांना दारूचे व्यसन जडले होते. त्यामुळे त्यांचे बरेच नुकसानदेखील झाले. ते स्वतःदेखील हे मान्य करतात.



## ॲक्टिंग मेरी महबूबा है, कभी यह रूठ जाती है..

वयोमानानुसार धर्मेंद्र ज्याप्रकारे चित्रपटातून आणखी चमकले असते, ते कमी–अधिक प्रमाणात होऊ शकले नाही. लंडनमध्ये दिलेल्या मुलाखतीत एकदा धर्मेंद्र मला म्हणाले होते, की ॲक्टिंग माझ्यासाठी प्रेमिका आहे, माझे त्यावर प्रेम आहे. ज्याप्रकारे प्रियकर–प्रेयसीमध्ये भांडण होते...कधी अभिनय रूसतो, तेव्हा मी त्याचे मन वळवतो, कधी मी रुसतो तेव्हा अभिनय माझे मन वळवते. मात्र मी त्याला सोडले नाही.

ही खरी गोष्ट आहे, की धर्मेंद्र यांनी अभिनय कधी सोडला नाही. मधून–मधून ते त्यांच्या या प्रेयसीला भेटण्यासाठी जात होते आणि भूमिका चांगली असेल तर त्यात त्यांचे ते जुने रूप, अंदाज पाहायला देखील मिळायचा.

‘जॉनी गद्दार’ या चित्रपटात त्यांच्या गँगचे सदस्य वयस्कर धर्मेंद्र यांच्या क्षमतेवर शंका व्यक्त करतात. त्यावेळेस ते म्हणतात – ‘ इट्स नॉट द एज, इट्स द मायलेज. ’ म्हणजेच वयावर जाऊ नका, क्षमता लक्षात घ्या. ‘ लाईफ इन अ मेट्रो ’मध्ये आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात आपली प्रेयसी नफिसा अलीबरोबर काही क्षण घालवणारा मिस्टर अमोल असो की रानी और रॉकी की प्रेम कहानीमधील स्मरणशक्ती गमावलेला प्रियकर असो. काही काळासाठीच असेल, त्यांची ती जुनी शान पुन्हा दिसली.




# जेजुरीगड, कडेपठाराचे सचित्र दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेजुरीगडाला खंडोबांची राजधानी मानले जाते. खंडोबांचे अवतारस्थान कडेपठार, मंदिराच्या दोन्ही मार्गांवरील देवता, त्यांचे ग्रांथिक व जनश्रुतीमधील संदर्भ यासह पायरीमार्ग व मंदिर यांचे सचित्र दर्शन.






### यात्रा, उत्सवाची परंपरा

गड व कडेपठारी होणारी भूपाळी, धूपआरती, शेजआरती हे दैनंदिन कार्यक्रम यांचे चित्रफितीद्वारा दर्शन, येथे वर्षभर होणाऱ्या चैत्र पौर्णिमा, सोमवती, गणपूजा, दसरा, चंपाषष्टी, पौष पौर्णिमा, माघ पौर्णिमा या उत्सवाची सचित्र माहिती व चित्रफितीद्वारे दर्शन, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, श्रीयाळषष्टी, छबिना, त्रिपुरी पौर्णिमा, जानाई देवी उत्सव अशा वर्षभर साजऱ्या होणाऱ्या स्थानिक उत्सवांची सचित्र व चित्रफितीद्वारे दर्शन व माहिती.

### जेजुरीतील प्रेक्षणीय स्थळे

जेजुरीतील मल्हार गौतमेश्वर मंदिर, होळकर तलाव, बल्लाळेश्वर, लवथळेश्वर मंदिर, जानाई मंदिर, मल्हारतीर्थ, जननी तीर्थ, लव तीर्थ, पेशवे तलाव इत्यादी प्रेक्षणीय स्थळे यांचे संदर्भासह दर्शन.

### जेजुरी ऐतिहासिक, सांस्कृतिक

जेजुरीतील ऐतिहासिक घटनांचा माहितीसह सचित्र इतिहास, जेजुरीचे भूमीतील शीघ्रकवी सगनभाऊ, लावणी सम्राज्ञी रोशन सातारकर, चित्रअभिनेत्री लीला गांधीसारख्या येथील नामवंत कलाकारांचा जीवन परिचय व येथील लोककलेची सांस्कृतिक परंपरा याची माहिती.

### जेजुरी परिसरातील मंदिरे

जेजुरी परिसरातील शंकरेश्वर, रामेश्वर ( साकुर्डे ), पांडेश्वर, भुलेश्वर, नागेश्वर ( नाझरे ), वाल्मिकी ऋषी समाधी ( वाल्हे ), मयुरेश्वर ( मोरगाव ), संत सोपानदेव समाधी, संगमेश्वर, सिद्धेश्वर ( सासवड ), जवळार्जुन, चतुर्मुख ( गराडे ), महादेव ( हरणी ), वाल्मिकी तपोभूमी ( कोळविहीरे ), वाघेश्वरी ( पिंगोरी ), हरेश्वर, यमाई ( शिवरी ), नारायणपूर, बालाजी ( केतकवळे ), म्हस्कोबा ( वीर ), सोमेश्वर ( करंजे ), कानिफनाथ, गुळुंचे, आंबळे, कुमजाई, किल्ले पुरंदर, वज्रगड, मल्हारगड ( सोनोरी ) या विविध मंदिरे, किल्ले, प्रेक्षणीय स्थळे यांचे संदर्भासह दर्शन.

### खंडोबा परिवार देवता, पूजा प्रतीके, धार्मिक विधी

खंडोबांच्या देवता परिवारात पुजल्या जाणाऱ्या हेगडी प्रधान, म्हाळसा, बाणाई, घोडा, कुत्रा, या परिवार देवताची सचित्र माहिती, उपासनेत व देवघरात पुजली जाणारी टाक, मूर्ती, ही पूजा प्रतीके व दिवटी, गाठा, शिक्का, घोळ, कोटंबा, भंडारी, लंगर, घाटी या प्रतीकांची सचित्र माहिती, वाघ्या-मुरुळी हे उपासक व तळी भंडार, जागरण, चंपाषष्टी घट या कुलधर्म कुलाचाराची व विविध पूजा विधी, आरती, मंत्र, श्लोक यांची माहिती.

### खंडोबा ग्रंथ, साहित्य, लोकवाणी

खंडोबांविषयक मल्हारी महात्म्य, जयाद्री महात्म्य, मार्तंड विजय या विविध ग्रंथांचा परिचय, श्री मार्तंड भैरव अवतार सचित्र कथासार, विविध लोकगीते व वाघ्या-मुरुळी या उपासकांच्या वाणीतून घडणारे खंडोबा जेजुरीचे दर्शन व संत नरहरी सोनार, संत जनाबाई, संत एकनाथ, संत तुकाराम, रामदास स्वामी इत्यादी संतांचे आरती, भारूड, अभंग या लिखाणातून होणारे खंडोबा दर्शन.

## वारी खंडोबांची

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खंडोबांचे भक्त नेहमी जेजुरीची वारी करतात. लग्न झाल्यावर नव्या दाम्पत्याने जेजुरीस ' वर पाया पडावयास ' जाण्याची प्रथा काही घराण्यांतून आढळते. कित्येक लोक गावाबाहेर जाऊन ज्या दिशेला जेजुरी असेल त्या दिशेला तोंड करून देवाची पूजा करतात. चंपाषष्ठीच्या दिवशी काही घराण्यांतून अशी पद्धत आहे, की सायंकाळी घरातील प्रमुखाने ' चला जेजुरीला ' असा पुकार करावयाचा. तो होताच घरातील सर्व लहान-थोर स्त्री-पुरुष मंडळी अंगावर चांगले कपडे चढवितात. सुवासिनी हातात पंचारती घेतात. कोणीतरी एक जण मशाल पाजळतो. दुसरा हातात तेलाची बुदली घेतो. असा सर्व जामानिमा झाला, की सर्व जण घराबाहेर पडून ज्या दिशेला जेजुरी असेल, त्या दिशेला तोंड करून खंडोबाचे पूजन करतात.

खंडोबांचे भक्त रविवार हा दिवस पवित्र मानतात. काही घराण्यांतून या दिवशी ' वारी ' मागण्याची पद्धत आहे. घरातील एखाद्या व्यक्तीने हातात ताम्हण घेऊन पाच घरी जाऊन ' खंडोबास वारी ' असे मोठ्याने म्हणावयाचे. अशा रीतीने जमा करून आणलेल्या पिठाची भाकरी करून ती जेवताना घरातील सर्वांनी प्रसाद म्हणून खावयाची. वारी मिळाल्यावर अन्नाची कधी तूट पडत नाही अशी समजूत आहे.

या वारीचा दुसराही एक घरच्या घरी प्रकार आहे. कुळधर्माच्या किंवा चंपाषष्ठीच्या दिवशी पुरणावरणाचा स्वयंपाक होतो. त्यादिवशी सवाष्ण-ब्राह्मण जेवायला असतात. पूजा, नैवेद्य, तळी आरती व वैश्वदेव होऊन सर्वांची पाने वाढली, की घरातील एखाद्या व्यक्तीने एक ताटली घेऊन पाटावर बसलेल्या सवाष्ण- ब्राह्मणांपुढे जाऊन ' वारी खंडोबांची ' असे म्हणायचे. त्यांनी आपल्या ताटातल्या पुरणपोळीचा तुकडा तुपात भिजवून तो व थोडासा भात ताटलीत टाकायचा. ही वारी घरातील सर्व मंडळींना वाढावयाची. त्यानंतर पंगत सुरू करावयाची. कुळधर्माच्या दिवशी कित्येक घराण्यातून वाघ्या-मुरळी जेवावयास घालण्याचाही प्रघात आहे. कुत्र्यालाही या दिवशी पोळी घालतात.

खंडोबा कुलदैवत असलेल्या घराण्यातून देव्हाऱ्यात ऐपतीप्रमाणे सोने, चांदी, पितळ यांचे टाक असतात. देवळात खंडोबा, म्हाळसा व बाणाई यांच्या पाषाणाच्या मूर्ती असतात. पुरणपोळी खंडोबाला प्रिय म्हणून कुळधर्माच्या किंवा चंपाषष्ठीच्या दिवशी पुरणाच्या पोळीचाच नैवेद्य असतो.

लग्नकार्यात खंडोबांचे टाक करून घेतात. एरवी कधीही करत नाहीत. सटीचे दिवशी वेशीवरील खंडोबाचे देवळात पोतासाठी तेल व नैवेद्य सोवळ्याने घेऊन जातात व तेथे नैवेद्य अर्पण करून पोत पेटता ठेवून घरी येतात. लग्नकार्यानंतर खंडोबांनाच पाचारण केले जाते व त्यांचाच गोंधळ घातला जातो.

## पाप आणि पुण्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मानव क्रियाशील आहे. कृतीला परिणाम (फल) असतेच. ज्याला आपण आध्यात्मिक किंवा सूक्ष्म स्तरावर ' ऊर्जा ' म्हणतो, त्याचेच दोन प्रकार म्हणजे पाप आणि पुण्य. प्रकृतीमध्ये सर्व काही द्वैत आहे. दिवस-रात्र, उष्ण-शीत, सुख-दुःख. त्याप्रमाणे कर्मसृष्टीतही पुण्य-पाप ही द्वैताची जोडी नैसर्गिक आहे. जसे शरीराने खाल्लेले पौष्टिक अन्न आरोग्य निर्माण करते आणि खराब अन्न रोग वाढवते तसेच मनकर्मांनी निर्माण होणारा चांगला संस्कार ' पुण्य ' आणि वाईट संस्कार ' पाप ' तयार करतो. कर्म केवळ बाह्य नसते. अंतरंगातील भावना आणि उद्देशही तेवढाच महत्त्वाचा असतो. निष्कपट भावना आणि मनाची शुद्धता असेल तर ' पुण्य ' घडते. द्वेषयुक्त भावना आणि मनाची कलुषता असेल तर ' पाप ' घडते. शुभ संस्कार, सत्य, अहिंसा, करुणा यांनी घडते ते पुण्य. जे राग, द्वेष, लोभ, मोह, अहंकार, मत्सर यांनी घडते ते पाप. न्यायशास्त्र पाप-पुण्याला एक अभौतिक कारण मानते ज्यातून फल जन्मते. आपल्या प्रत्येक कृतीमधुन एक अदृश्य फलबीज तयार होते. हे बीज भविष्यातील सुख-दुःखांचे कारण बनते. म्हणजेच आपले कर्म (कृती) आपल्या भविष्याला जवाबदार आहे. कर्मांना योग्य दिशा देऊन आपण भविष्य पण बदलू शकतो. कर्मांना योग्य दिशा देण्याच मुख्य ध्येय घेऊनच वेदांत, दर्शनात उपदेश केला आहे. वेदांत म्हणतात पाप-पुण्य हे देहालाच लागू होतात, आत्म्याला नाही. कारण पाप-पुण्य हा प्रकृतीच्या गुणांचा खेळ आहे. सत्वगुणाचा प्रभाव असेल तर पुण्य, रजो आणि तमोगुणाचा प्रभाव असेल तर पाप घडते. कर्मफल ही प्रकृतीची कार्यप्रणाली आहे. यातून आत्मा अप्रभावित आहे. पण देह आणि मनाला भोग येतात.

' परोपकाराय मिदं पुण्यं पापाय परपीडनम्' अर्थात परोपकार करणे म्हणजे पुण्य आणी पीडा देणे म्हणजेच पाप. पीडा देण्याचे किंवा परोपकार करण्याचे तीन प्रमुख माध्यम आहेत काया (शरीर), वाचा (बोलणे) आणि मन. काम, क्रोध, लोभ, मोह या गुण व्यवस्थेवर नियंत्रण मिळवून पापावर मात करू शकतो. पापाचे मूळ रजो-तमो गुणात आहे. सत्व गुण वाढवून जसे आहार- विहार नियम, संगत सुधारणा, ईश्वरभक्ती करून पुण्य वाढवू शकतो. गीतेत कर्म फळांच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी निष्काम कर्म करण्याचा उपदेश दिला आहे. निष्काम कर्म करणे म्हणजे फळाची आसक्ती न ठेवता समर्पण वृत्तीने काम करणे. ' मी करतो ' हा अहंकार त्यागून मी करत नाही, गुणच कर्म करवतात, मी फक्त साक्षी आहे. प्रत्येक कर्म घरकाम, सेवा, पूजा, व्यवसाय, जबाबदारी भावनेने ' ईश्वरा 'साठी करणे. याला ईश्वरार्पण म्हणतात. असा समर्पित भाव ठेवून कर्म केले तर ' पाप ' घडण्याची शक्यताच नाही. फलआसक्ती काढली की मन हलके, निर्मळ होते. लोभ, भीती, चिंता हे सर्व फलआसक्तीतूनच येतात. त्यातून पुढे पाप बनते. निष्काम कर्माने आनंद स्थिर होतो. कर्म होत असते. पण कर्मबंधाची गाठ राहत नाही.

## खंडोबा यांचे नवरात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आश्विनात येथे नवरात्र बसते. त्यातील दसऱ्याच्या दिवशी कऱ्हेपठार आणि जेजुरीगडाहून खंडेराय पालख्यांत बसून एकमेकांना भेटण्यास निघतात. या पालख्या जेथे भेटतात त्या जागेला ' विसावा ' असे म्हणतात. दोन्ही देवांची भेट प्रथम आरशात प्रतिबिंब पाहून होते. नंतर ' रमणा ' येथे दोन्ही पालख्या एकत्र येतात. मग शोभेची दारू उडविण्यात येते. भंडारा उधळला जातो. त्यानंतर दोन्ही पालख्या आपापल्या मंदिराकडे परत जातात. गडावर उत्तरेच्या ओवरीत दसऱ्याच्या दिवशी दरबार भरतो. वाघ्या-मुरळींची नृत्ये व जागर होतो.



खंडोबांचे महत्त्वाचे नवरात्र मार्गशीर्षातील. ' चंपाषष्ठी 'चे किंवा ' वांगीसटीचे नवरात्र ' असे याला म्हणतात. हे नवरात्र असते फक्त पांच दिवसांचे. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला त्याचा प्रारंभ होतो. पंचमीला रात्री तेलाचा हंडा मिरवणुकीने देवळातून चावडीवर नेण्यात येतो. तेथे गावकरी त्यात तेल आणून घालतात. नंतर तो हंडा पुन्हा मिरवणुकीनेच गडावर नेण्यात येतो. मग त्यातील तेल खंडेरायांना अर्पण करण्यात येते. या उत्सवाला ' तिळवणाचा हंडा ' असे म्हणतात.

षष्ठी हा या नवरात्राचा शेवटचा दिवस. मार्तंडाने पाच दिवस घनघोर संग्राम करून केलेल्या मणी-मल्लाच्या वधाचा दिवस. म्हणून ' ढोंबर ' या पदार्थाचा नैवेद्य त्याला अर्पण करतात. जोंधळे शिजवून त्यात दही व मीठ घालून हा ढोंबरा तयार करतात. याशिवाय रोडगा, वांग्याचे भरीत, पातीचा कांदा आणि लसूण हे पदार्थ नैवेद्याचे पानात असतात; परंतु गडाखाली बाणाईच्या ठाण्यात मांसाचा नैवेद्य दाखवितात.

वांगीसटीच्या उत्सवात येथील सर्व दीपमाळा प्रज्वलित करण्यात येतात. पूर्वी षष्ठीच्या दिवशी तेथे भक्त 'बगाड' होत असे. म्हणजे पाठीत किंवा हातापायात खिळा खुपसून घेऊन प्रदक्षिणा घालत किंवा आपल्या शरीरात तलवार खुपसून त्या रक्ताचा टिळा खंडेरायांना लावत. विस्तवावरून चालण्याचीही येथे प्रथा होती; परंतु या सर्व प्रथा आता कायद्याने बंद केल्या आहेत.

पौष-पौर्णिमेला मल्लारी-म्हाळसा यांच्या विवाहाच्या वाढदिवसाचे निमित्ताने मोठी यात्रा भरते. याच दिवशी जेजुरीत गाढवांचा मोठा बाजार भरतो. माघी पौर्णिमा म्हणजे म्हाळसेचा जन्मदिन. या दिवशी येथे काठ्यांची यात्रा भरते. उंच बांबूला तांबडे पागोटे बांधून आणतात. त्यात होळकर, खैरे आणि होलम यांच्या काठ्या मानाच्या समजल्या जातात. वद्य द्वितीयेला गावात आलेल्या सर्व काठ्या मिरवणुकीने गडावर येतात. त्यानंतर कळसाला स्पर्श करून आपापल्या गावी परत जातात.

## महाशिवरात्रीलाच उघडणारे ' गुप्त मल्लेश्वर '

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुप्त मल्लेश्वराचे जेजुरीतील स्थान एका भिंतीच्या कोपऱ्यात आहे. ते फक्त महाशिवरात्रीच्या दिवशीच उघडे असते. त्यामुळे त्याच दिवशी मंदिराच्या आतील दोन्ही लिंगांचे दर्शन घेता येते. ही दोन लिंगे म्हणजेच शिव आणि पार्वतीची प्रतीके आहेत. एका बाजूला शेजघर आहे. तेथील मखरही चांदीने मढविलेले आहे. मुख्य मंदिराच्या पिछाडीला पंचलिंगेश्वराचे मंदिर आहे. पाचपिंडी येथे एकत्र आहेत. याशिवाय गणपती आणि तुळजाभवानी यांचीही मंदिरे आहेत.

### धृतमारीची शिळा

थोड्या अंतरावर जी तालीम आहे ती वीर उमाजी नाईक यांची आहे. तेथे एकमेव जी खिडकी आहे तेथून कठेपठारावरील खंडेरायाच्या मूळ मंदिराचे दर्शन होते. येथेच धृतमारीची शिळा आहे. मणी-मल्ल दैत्यांचा पाडाव करून त्यांना वठणीवर आणण्याकरिता शिवशंकरांनी मार्तंड अवतार धारण केला; परंतु हे दैत्य ऋषिजनांना देत असलेला त्रास ऐकून भगवान शंकर क्रोधायमान झाले व त्यांनी रागाने आपल्या जटा आपटल्या. त्यातून महामारी उत्पन्न झाली. तिने युद्धात मार्तंड भैरवाला खूप सहाय्य केले. पुढे तिला पोटभर तूप पाजून शांत केले. ती जेथे शांत झाली ती ही जागा आणि ती ही शिळा.

### खंडेरायांचा दिनक्रम

खंडेरायांची रोज पहाटे साडेचार, दुपारी साडेबारा आणि तीन वाजता व रात्री साडेआठ वाजता पंचामृताने स्नान घालून पूजा होते. शाहीर सगनभाऊ हे जेजुरीचे. पहाटेच्या पूजेवेळी त्यांची ' भूपाळी ' म्हणण्यात येते. या पूजेवेळी लिंगावरील मुखवटे व कवच काढण्यात येते. पूजा झाली, की ते पुन्हा घालण्यात येते. बेल, फुले, दवणा वाहून, भंडारा उधळून, येळकोट मल्हारचा जयघोष करण्यात येतो. तिन्ही वेळेला खंडेरायाला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात येतो. या पूजा-विधींमध्ये भाविकांनाही सहभागी होता येते. रात्रीची पूजा झाली, की गडाचे दरवाजे बंद करण्यात येतात. ते पुन्हा पहाटे पूजेवेळी उघडण्यात येतात.

शनिवारी व रविवारी रात्री मुख्य देवतेची पूजा झाल्यावर ती धुपारती बाणाई व हेगडी-प्रधान यांच्या मंदिरात नेण्याची प्रथा आहे. गडावर ईशान्य दिशेला एका कोपऱ्यात ' फिरंगाई ' आणि ' पिंगळा ' यांची ठाणी आहेत. नवरात्रात ' मंगळवारी ' व ' शुक्रवारी ' तेथेही ही धुपारती नेण्यात येते.

### रविवार खंडेरायांचा वार

वेगवेगळ्या देवतांचे वेगवेगळे वार आहेत. त्यात रविवार हा ' खंडोबाचा ' वार आहे. साहजिकच इतर दिवसांचे तुलनेत या दिवशी भाविकांची जेजुरीला जास्त गर्दी होते. खंडोबा हे शंकराचा अवतार असल्याने सोमवती अमावास्येला येथे मोठी यात्रा भरते. याशिवाय चैत्री पौर्णिमेला शंकराने मार्तंड भैरवाचा अवतार घेतला म्हणून श्रावणी पौर्णिमेला मल्लारी आणि बाणा यांचा विवाह संपन्न झाला म्हणून माघी पौर्णिमा हा म्हाळसेचा जन्मदिवस म्हणून सज्जनांना पीडा देणाऱ्या मणी-मल्लांना मार्तंड भैरवाने मार्गशीर्ष षष्ठीला यमसदनी पाठविले व तो लिंग रूपात प्रकट झाला, तो ' चंपाषष्ठीचा ' दिवस म्हणून. या सर्व दिवशी मोठी यात्रा भरते.

याशिवाय दसरा आणि महाशिवरात्रीला ही येथे मोठी यात्रा भरते. यापैकी सोमवती अमावास्या यात्रेचे एक वैशिष्ट्य आहे. तत्संबंधीची कथा अशी- समुद्र मंथनातून जी चौदा रत्ने निघाली, त्यात रंभाही होती. शंकराने आपला स्वीकार करावा अशी तिची मनोकामना होती. परंतु ती इंद्राच्या वाट्याला आल्यामुळे तिची इच्छा अतृप्त राहिली. निदान आपण शंकराची दासी व्हावे, असे तिला वाटू लागले. महर्षी नारदाने ते जाणले आणि तिला शिवमंत्राचा जप करण्यास सांगितले. परिणामी भोलेनाथ संतुष्ट झाला. त्याने तिला ' मार्तंड अवतारात मी तुझी इच्छा पूर्ण करेन ' असा वर दिला. त्याप्रमाणे यथावकाश मार्तंड अवतारात त्याने ' गुप्त मल्लेश्वर ' होऊन तिची मनोकामना पूर्ण केली. त्या रंभेचे ठाणे कऱ्हा नदीच्या तीरावर असून सोमवती अमावास्येला मार्तंड भैरव तेथे स्नानाला जातात व तिला भेटतात.

